महा मेट्रो

PUNE METRO

**महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड**

***(पुणे मेट्रो रेल प्रकल्प) ***

**महामेट्रो पुणे तर्फे हेल्मेट्स वाटप**



पुणे 21: महामेट्रो पुणेच्या दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त सुरक्षा मोहीम नळ स्टॉप, कर्वे नगर आणि एरंडवणे पोलीस चौकी येथे राबवण्यात आली. दुचाकी चालकांच्या सुरक्षेसाठी महामेट्रो तर्फे हेल्मेट्स वितरीत करण्यात आले. दुचाकी चालकांना हेल्मेट वापरण्याकरिता प्रोत्साहित करणे आणि हेल्मेट वापरण्याचे महत्व पटवून  देणे हा महामेट्रोच उद्धेश होता. हे वाटप महामेट्रो आणि पुणे ट्रॅफिक पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले तसेच याप्रसंगी नागरिकांना तिळगुळ देण्यात आले.

याप्रसंगी महामेट्रोतर्फे ट्राफिक वॉर्डन आणि QRT (Quick Response Team) मार्शल रस्ता वाहतूक नियमन करत होते. हा उपक्रम अजून ठिकठिकाणी आयोजित करण्यात येणार असून आत्तापर्यंत महामेट्रोने ५० हेल्मेट्स चे वितरण केले आहे. हेल्मेटमुळे मोटारसायकल चालकाला सुरक्षेची हमी मिळते आणि यामुळे जीवित हानी वाचू शकते.